जो पण टेक्नीकल प्रोसेस करायची आहे ती करून घ्या. कारण तिथे पाणी साचते त्यामूळे लोकांना त्रास होतो.

दिपक खांबित :-

गॅरेज आहे ना.

मर्लिन डिसा :-

गॅरेजच्या बाजूला

सुहास रकवी :-

तिकडे ऑलरेडी नाला आहे.

मर्लिन डिसा :-

गणपती मंदिराजवळ आणि कॉस्मो पॉलेटियन शाळेजवळ पॉईट नं. २१ उद्याने दुरूस्ती करावयाची आहेत. मी एक वर्षापासून मेश्राम साहेबांना सांगत आहे. साईबाबा नगर उद्यानामध्ये जॉगींग ट्रॅक पेव्हर ब्लॉक्स निघालेले आहेत. कंटीन्यू खांबित साहेबांना पण सांगितले आहे लास्ट वीकमध्ये मी जाऊन परिस्थिती पाहिली तिथे सिनियर सिटीझन्स स्लीप होतात. प्रायोरिटी बेसीस पे उसे रिपेअरिंग करो। सिनियर सिटीझन्स,बच्चे उधर गिर रहे है.

प्रकरण क्र. ३९ :-

निविदांना मान्यतादेणे. (एकुण २४ कामे.)

ठराव क्र. ३७ :-

| अ क्र | टेंडर आय डी क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. समिती शिफारस दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २३६०६ | मिरारोड (पूर्व) शितलनगर नर्सरी बाजूचा नाला बांधणे.<br>मे. गिरीराज इन्फ्रा<br><br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. श्रृती इंटरप्रायझेस | रु.५८,९३,७००/<br>९.५ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>९.५ % कमी दराने<br>०.५ % कमी दराने<br>१४.०० % जास्त दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस / दै. मुंबई टाईम्स दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |
| २ | २३६०७ | मिरारोड (पूर्व) प्लेझंट पार्क डॉन बास्को रस्ता दोन्ही बाजूस गटारे बांधणे.<br>मे. एम.एम. इंटरप्रायझेस<br><br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. श्रृती इंटरप्रायझेस | रु.९५,८३,५००/-<br>०.५ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>०.६ % कमी दराने<br>१४.०० % जास्त दराने<br>१५.०० % जास्त दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस / दै. मुंबई टाईम्स दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |
| ३ | २३६०८ | भाईंदर (प.) जय अंबे झोपडपट्टी भूमिगत गटारे/ रस्ते करणे.<br>मे. राठोड असोसिएट्स<br><br>मे. राठोड ब्रदर्स<br>मे. एन.जे. ब्रदर्स | रु.५०,००,०००/-<br>९.०० % जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>अंदाजपत्रकीय दराने<br>१५.०० % जास्त दराने<br>१३.०० % जास्त दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस / दै. मुंबई टाईम्स दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |
| ४ | २३६११ | मिरारोड (पूर्व) कनकीया आरक्षण क्र. २५१, २५२ जागेलगत गटार व कुंपणभिंत बांधणे | रु.५७,८७,८००/- | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस / दै. मुंबई टाईम्स | दि.०२/०३/२०१६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मे. साई गणेश इंटरप्रायझेस<br><br><br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. गुरुजी इन्फ्रा प्रोजेक्ट<br>मे. चंदना कंस्ट्रक्शन | १०.००% जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>अंदाजपत्रकीय दराने<br>१५.०० % जास्त दराने<br>१५.००% जास्त दराने<br>१४.५० % जास्त दराने | | | दि.२६/०४/२०१६ | |
| ५ | २३६१७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सब-वे, शाळा इमारती, सार्वजनिक इमारती, वाचनालये, समाजमंदिरे, व्यायामशाळा, रुग्णालये मधील आवश्यकतेनूसार दुरुस्ती कामे करणे (वार्षिक निविदा)<br>मे. राठोड असोसिएट्स<br><br>मे. कंचन कंस्ट्रक्शन<br>मे. राठोड ब्रदर्स | रु.१,००,००,०००/-<br><br><br><br>२१.०० % जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>अंदाजपत्रकीय दराने<br>२५.०० % जास्त दराने<br>२५.०० % जास्त दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस / दै. मुंबई टाईम्स<br>दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |
| ६ | २३६१९ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. ३३१ ते ३३५ या जागेस कुंपणभिंत बांधणे.<br><br>मे. राठोड ब्रदर्स<br><br>मे. कल्पतरु इंटरप्रायझेस<br>मे. राठोड असोसिएट्स | रु.९२,५०,०००/-<br><br>१५.०० % जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>अंदाजपत्रकीय दराने<br>१७.०० % जास्त दराने<br>१६०० % जास्त दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस / दै. मुंबई टाईम्स<br>दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |
| ७ | २३६२० | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २४२, उद्यान आधुनिक पध्दतीने विकसित करणे<br><br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br><br>मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा प्रोजेक्ट<br>मे. आशापुरा कंस्ट्रक्शन | रु.४,३७,२३,२४८/-<br>१२.५० % जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>अंदाजपत्रकीय दराने<br>१६.०० % जास्त दराने<br>१६.०० % जास्त दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस/<br>दै. मुंबई मिरा<br>दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |
| ८ | २३६२४ | भाईंदर (पूर्व) आशानगर ते आर.एन.पी. पार्क पर्यंत नाला दुरुस्ती व स्लॅब टाकणे. | रु.६३,२२,४४०/- | दि.०१/०७/२०१५ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस/<br>दै. मुंबई मिरा | दि.०२/०३/२०१६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मे. श्रृती इंटरप्रायझेस<br><br><br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. मुस्कान इंटरप्रायझेस | ९.०० % जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१.०० % कमी दराने<br>१५.०० % जास्त दराने<br>१५.०० % जास्त दराने | | | दि.२६/०४/२०१६ | |
| ९ | २३६२७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) पंडीत भिमसेन जोशी (टेंभा हॉस्पिटल) रुग्णालयातील लाईटींग लोड करीता २५० केव्हीए क्षमतेचे जनित्र बसविणे व इतर आवश्यक कामे करणे<br>मे. शेखर इलेक्ट्रीकल्स<br>मे. आदित्य इलेक्ट्रीकल<br>मे. युटीलिटी इंटरप्रायझेस | रु.७३,१०,२२६/-<br><br><br>०.१५ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>०.१५ % कमी दराने<br>६.९ % जास्त दराने<br>२.९९ % जास्त दराने | दि.१२/०२/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस/<br>दै. मुंबई मिरा<br>दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |
| १० | २३६२८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) पंडीत भिमसेन जोशी (टेंभा हॉस्पिटल) रुग्णालयातील उपकरणांकरीता २५० केव्हीए क्षमतेचे जनित्र बसविणे व इतर आवश्यक कामे करणे.<br>मे. शेखर इलेक्ट्रीकल्स<br><br>मे. आदित्य इलेक्ट्रीकल<br>मे. युटीलिटी इंटरप्रायझेस | रु.५६,९३,९८४/-<br><br><br>०.२ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>०.२ % कमी दराने<br>७.५ % जास्त दराने<br>३.५ % जास्त दराने | दि.१२/०२/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस / दै. मुंबई टाईम्स<br>दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |
| ११ | २३७४२ | भाईंदर (पूर्व) चौपाटी सुंदरीकरण नविनीकरण करणे.<br>मे. आर.एस. कंस्ट्रक्शन<br><br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. श्रीजी कंस्ट्रक्शन | रु.३,६०,३७,०४७/-<br>७.२ % जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>अंदाजपत्रकीय दराने<br>१२ % जास्त दराने<br>१३.३३ % जास्त दराने | दि.०१/०७/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस / दै. मुंबई टाईम्स<br>दि.२६/०४/२०१६ | दि.०९/०५/२०१६ |
| १२ | २३६४७ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेज-४ तपोवन विद्यालय ते राम वाटीका पर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रू.३७,७९,९००/- | दि.०९/०२/२०१५ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस / दै. मुंबई टाईम्स | दि.२९/०२/२०१६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मे. एकता कंस्ट्रक्शन<br><br>मे. कनिष्क कंस्ट्रक्शन<br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर | १५.३१ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१५.३१ % कमी दराने<br>१०.२५ % कमी दराने<br>१२ % जास्त दराने<br>१२.०१ % कमी दराने | | | दि.२६/०४/२०१६ | |
| १३ | २३६४८ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेज-६ मथुरा अपार्ट ते आर.बी. के. ग्लोबल स्कुल रस्त्याच्या दोन्ही बाजुस गटार बांधणे.<br>मे. एकता कंस्ट्रक्शन<br><br>मे. स्टार कंस्ट्रक्शन<br>मे. एन.जे. ब्रदर्स<br>मे. सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर<br>मे. राठोड ब्रदर्स<br>मे. राठोड असोएिट्स | रू.३७,९०,५५०/<br><br>१५.३१ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१५.३१ % कमी दराने<br>१३.०० % कमी दराने<br>९.५०. % जास्त दराने<br>१२.०१ % कमी दराने<br>१२.०० % जास्त दराने<br>११.०० % जास्त दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस/<br>दै. मुंबई मिरा<br>दि.२६/०४/२०१६ | दि.२९/०२/२०१६ |
| १४ | २३६४९ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेज-६ आर.बी.के. ग्लोबल स्कुल ते एम्स जंक्शन पर्यत गटार बांधुन स्लॅब टाकणे.<br>मे. सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर<br><br>मे. स्टार कंस्ट्रक्शन<br>मे. एकता कंस्ट्रक्शन | रू.३७,९०,५५०/-<br><br>१६.१ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१६.१ % कमी दराने<br>१३.००% कमी दराने<br>१२.०१% कमी दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस/<br>दै. मुंबई मिरा<br>दि.२६/०४/२०१६ | दि.२९/०२/२०१६ |
| १५ | २३६५० | मिरारोड (पूर्व) शिवार गार्डन समोरील बाजू ते सरदार पटेल शाळा पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे.<br>मे. स्टार कंस्ट्रक्शन<br><br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस<br>मे. आर.एस. कंस्ट्रक्शन<br>मे. एम. एस. इंटरप्रायझेस | रू.४९,९१,०५०/-<br><br>१३.०० % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१३.०० % कमी दराने<br>९.०० % कमी दराने<br>१२.५ % कमी दराने<br>१२.०६ % कमी दराने | दि.०९/०२/२०१५ | दै. यशोभूमी / दै. लक्षद्विप<br>दि.२०/२/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दि.२९/०२/२०१६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ५.००% कमी दराने | | | | |
| १६ | २३६५१ | मिरारोड (पूर्व) आर.बी.के. शाळेसमोरील रस्त्यालगत गटारे बांधुन स्लॅब टाकणे<br>मे. स्टार कंस्ट्रक्शन<br><br><br>मे. आकाश इंटरप्रायझेस<br>मे. कंचन कंस्ट्रक्शन<br>मे. तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस<br>मे. चंदना कंस्ट्रक्शन | रू.४९,९९,८००/-<br><br>१३.०० % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१३.०० % कमी दराने<br>१२ % जास्त दराने<br>१३ % जास्त दराने<br>१२.०५ % कमी दराने<br>५.००% कमी दराने | दि.०९/०२/२०१५ | दै. यशोभूमी / दै. लक्षद्विप<br>दि.२०/२/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दि.२९/०२/२०१६ |
| १७ | २३६५३ | दाचकुलपाडा ते साई पॅलेस मुख्य नाला पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे.<br>मे. ईरा इंटरप्रायझेस<br><br><br>मे. श्री कृपा इंटरप्रायझेस<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. श्री गणेश इंटरप्रायझेस<br>मे. श्रृती इंटरप्रायझेस | रु. २८,४३,०००/-<br><br>१५.३१% कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१५.३१% कमी दराने<br>१२.०१७०४ % कमी दराने<br>६.००% कमी दराने<br>७.००% कमी दराने<br>८.००% कमी दराने | दि.०९/०२/२०१५ | दै. यशोभूमी / दै. लक्षद्विप<br>दि.२०/२/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दि.२९/०२/२०१६ |
| १८ | २३६५४ | काशिगांव सिल्व्हर सरीता कॉम्पलेक्स रस्त्यालगत गटारे बांधुन स्लॅब टाकणे<br>मे. आकाश इंटरप्रायजेस<br><br>मे. एकता कंस्ट्रक्शन<br>मे. जयलक्ष्मी कंस्ट्रक्शन<br>मे.मुस्कान इंटरप्रायजेस<br>मे.आर.एस. कंस्ट्रक्शन | रू.३९,४६,७००/-<br><br>१५.९१% कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१५.९१% कमी दराने<br>१५.९ % कमी दराने<br>१३.५३ % कमी दराने<br>१२.२९ % कमी दराने<br>१३.३२% कमी दराने | दि.०९/०२/२०१५ | दै. यशोभूमी / दै. लक्षद्विप<br>दि.२०/२/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दि.२९/०२/२०१६ |
| १९ | २३६५५ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २६९ उद्यान विकसित करणे | रु.१,००,००,०००/- | दि.०९/०२/२०१५ | दै. यशोभूमी / दै. लक्षद्विप | दि.२९/०६/२०१६ | दि.२९/०२/२०१६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br><br><br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. एम.एस.इंटरप्रायझेस | ७.२९ % जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>३.०० % कमी दराने<br>२९.००% जास्त दराने<br>९.०० % जास्त दराने | | दि.२०/२/२०१६ | | |
| २० | २३७०६ | मिरा भाईंदर महानगरपालिका येथील दहिसर चेकनाक्याजवळ (सम्राट हॉटेल) राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर फूट ओव्हर ब्रीज बांधणे. (खासदार निधी)<br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br><br><br>मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा प्रोजेक्ट<br>मे. आशापुरा कंस्ट्रक्शन | रु. २,१७,९३,०००/<br><br><br><br>२३.००% जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१६.२३% जास्त दराने<br>२७.००% जास्त दराने<br>२५ % जास्त दराने | दि.२६/०२/२०१६ | दै. वार्ताहर /<br>महाराष्ट्र जनमुद्रा<br>दि.२३/३/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दि.०४/०४/२०१६ |
| २१ | २३६१४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रकारचे फलक, दुभाजक ग्रील, रेलिंग, कर्बस्टोन, स्लॅब, फुटपाथ दुरूस्ती, गतिरोधक पट्टे, झेब्रा क्रॉसिंगपट्टे इत्यादी कामे करणे (वार्षिक निविदा)<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br><br><br>मे. रिध्दीका इंटरप्रायझेस<br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. कंचन कंस्ट्रक्शन | रु.१,००,००,०००/-<br><br><br><br><br>०.५% कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>०.६% कमी दराने<br>१८.०० % जास्त दराने<br>२२.०० % जास्त दराने<br>१२.०० % जास्त दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस/<br>दै. मुंबई मिरा<br>दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |
| २२ | २३६२१ | मिरारोड (पूर्व) पूनमगार्डन येथील सुविधा क्षेत्र इमारतीमध्ये अभ्यासिका, विरंगुळा केंद्र व कार्यालयासाठी फर्निचर इ. व्यवस्था करणे.<br>मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा<br><br>मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स | रु.१,०३,२५,९००/-<br><br>२४.०२ % जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>अंदाजपत्रकीय दराने<br>२९.०० % जास्त दराने | दि.३०/०१/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस/<br>दै. मुंबई मिरा<br>दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मे. सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर | ३०.०० % जास्त दराने | | | | |
| २३ | २३६२९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) पंडीत भिमसेन जोशी (टेंभा हॉस्पिटल) रुग्णालयात प्रवासी उद्वाहक बसविणे व इतर आवश्यक कामांसहीत कार्यान्वित करणे. | रु.४६,१७,५००/- | दि.२६/०२/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस/<br>दै. मुंबई मिरा<br>दि.२६/०४/२०१६ | दि.०२/०३/२०१६ |

| Sr. No | Description | Qty | Victory Pvt. Ltd. | Jolly Elevetore Pvt. Ltd. | Miracal Electrical Solution India Pvt. Ltd. | New Fild | Utility Enterprises |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | | | | |
| 1 | Supply & installation of stretcher Lift at Tembha hospital building. | 1 | 3325000<br>दरवाटाघाटीनंतर<br>**3325000** | 3648000 | 3500000 | 4100000 | 4000000 |
| 2 | Supply of Scaffolding including Erection and Dismantling for 1 nos. of Lift for 4 Months | 1 | 40000<br>दरवाटाघाटीनंतर<br>**40000** | 100000 | 375000 | 420000 | 400000 |
| 3 | Painting For 1 nos of lift | 1 | 48000<br>दरवाटाघाटीनंतर<br>**48000** | 100000 | 75000 | 82000 | 80000 |
| 4 | Core Cutting for 1 nos of Lift | 1 | 20000<br>दरवाटाघाटीनंतर<br>**20000** | 100000 | 42500 | 45000 | 45000 |
| 5 | Civil Work | 1 | 660000<br>दरवाटाघाटीनंतर<br>**660000** | 300000 | 625000 | 680000 | 660000 |
| | **Total** | | 4093000<br>दरवाटाघाटीनंतर<br>**4093000** | 4248000 | 4617500 | 5327000 | 5185000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | २३६३० | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) पंडीत भिमसेन जोशी (टेंभा हॉस्पिटल) रुग्णालयात रुग्णांकरीता उद्वाहक बसविणे व इतर आवश्यक कामांसहीत कार्यान्वित करणे. | रु.४७,१७,५००/- | दि.२६/०२/२०१६ | दि.२९/०६/२०१६ | दै. वृत्तमानस/<br>दै. मुंबई मिरा<br>दि.२६/०४/२०१६ | |

| Sr. No | Description | Qty | Victory Pvt. Ltd. | Jolly Elevetore Pvt. Ltd. | Miracal Electrical Solution India Pvt. Ltd. | New Fild | Utility Enterprises |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **Rate** | | | | |
| 1 | Supply & installation of stretcher Lift at Tembha hospital building. | 1 | 3610000 **दरवाटाघाटीनंतर 3610000** | 3790000 | 3600000 | 4100000 | 4200000 |
| 2 | Supply of Scaffolding including Erection and Dismantling for 1 nos. of Lift for 4 Months | 1 | 40000 **दरवाटाघाटीनंतर 40000** | 100000 | 375000 | 410000 | 420000 |
| 3 | Painting For 1 nos of lift | 1 | 48000 **दरवाटाघाटीनंतर 48000** | 100000 | 75000 | 81000 | 82000 |
| 4 | Core Cutting for 1 nos of Lift | 1 | 20000 **दरवाटाघाटीनंतर 20000** | 100000 | 42500 | 46000 | 48000 |
| 5 | Civil Work | 1 | 660000 **दरवाटाघाटीनंतर 660000** | 300000 | 625000 | 670000 | 680000 |
| | **Total** | | 4378000 **दरवाटाघाटीनंतर 4378000** | 4390000 | 4717500 | 5307000 | 5430000 |

अ.क्र. १९ कामाच्या जागेवर SPML कंपनीचे पाईप व सामान असून त्यांचे काम सुरू असल्याने सदर सामान व पाईप हटविता येणार नाही. त्यामुळे सदर प्रकल्प पूर्ण झाल्यावरच सदर उद्यानाचे कुंपणभिंत व सुशोभिकरण करणे योग्य होईल. सद्यस्थितीत सदर कामाची निविदा रद्द करण्यात येत असून जागा रिकामी झाल्यानंतर सदर कामाची नविन निविदा मागविण्यात यावी. तसेच अ.क्र. १ ते १८ व अ.क्र. २० ते २४ कामांसाठी कामी कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यास शिफारस आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पार पाडण्यात येणाऱ्या बांधकामामध्ये कॉक्रीटीग सिमेंट प्लास्टर, फ्लोरींग मध्ये मजबुती येण्यासाठी मे. लायन प्रोडक्ट कडील साहीत्य वापरल्यास बांधकामाचा दर्जा अधिक चांगला हाणार असून प्रशासनाने प्रायोगिक तत्वावर रु.२५.०० लक्ष रकमेचे साहीत्य खरेदी करणेस प्रस्ताव दिला आहे. तरी सदर खर्चास व विना निविदा मे. लायन प्रोडक्ट कडील साहीत्य खरेदी करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुचूची 'ड' मधील प्रकरण पाच (दोन)(दोन) अन्वये मान्यता देऊन मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सुचक :- श्री. प्रभाकर म्हात्रे अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४०, मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणेबाबत.

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ४० :-

मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणेबाबत.

ठराव क्र. ३८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागाने महानगरपालिकेचे स्वतंत्र संकेतस्थळ देखभाल व दुरुस्ती करणे, अद्यावत करणे व नवीन विकसीत करणेबाबत ई-निविदा मागविण्यात आलेली आहे. याकामी दोन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या असून निविदाधारकांनी वाटाघाटीनंतर खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| Sr.No. | Particular | Webian Technologies Pvt.Ltd. | | IT Shatra Pvt.Ltd |
|---|---|---|---|---|
| | | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर | |
| 1 | Annual Technical Support, upgradation and new development in MBMC website (www.mbmc.gov.in) | Rs.3,90,000/- | Rs.3,85,000/- | Rs.14,00,000/- |

M/s. Webian Technologies Pvt.Ltd. यांचे वाटाघाटीनंतरच्या दरास मा.आयुक्त सो. यांची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरकामी एकूण रु.३,८५,०००/- वार्षिक खर्च होणार आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मा.स्थायी समिती सभेत अवलोकन करण्यात येत आहे.

सही/-<br>
सभापती<br>
स्थायी समिती<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४१, अनुसुची "ड" प्रकरण २ (के) अन्वये प्रस्ताव - महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ७५ द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेसाठी राखीव निधीतील रक्कम सर्वसाधारण निधीत वळती करणेबाबत.

शरद पाटील :-

मिरा भाईदर शहरात सद्याची पाणी पुरवठा तफावत पुर्ण करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून अतिरिक्त ७५ द.ल.लि. पाणी मंजुर करण्यात आलेले आहे. मंजुर अतिरिक्त ७५ द.ल.लि.पाणी शहरापर्यंत आणणे करीता राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नविन पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत येणारी कामे प्रगतीपथावर आहेत. महापालिका क्षेत्रात अपुरा पाणी पुरवठा होत असल्यामुळे सदर योजना विहित कालावधीत पुर्ण करणे अतिशय आवश्यक आहे. सदर योजनेसाठी महानगरपालिकेचा स्वतःचा हिस्सा सन २०१६-१७ या वित्तिय वर्षाचे अंदाजपत्रकात पृष्ठ क्र.५४ वरील अनु.क्र. १ (ब)(२) मध्ये 'जल व मलप्रवाह निधी अंशदान' अंतर्गत २०००.०० लक्ष तरतुद आहे. सदरील राखीव निधीतुन पाणी योजनेसाठी देयक प्रदानाची कार्यवाही करण्यासाठी राखीव निधी मुदत पूर्व सर्वसाधारण निधीवर जमा करुन घेऊन प्रदान करावा लागणार आहे. तरी राखीव निधीतील रक्कम सर्वसाधारण निधीवर जमा करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

दिनेश जैन :-

आपल्या मिरा भाईदरमध्ये आपण खूप मोठी योजना करणार आहोत. सध्य परिस्थितीत किती काम झाले आणि त्याची परिस्थिती काय आहे.

प्रशांत केळुसकर :-

साहेब, विषय असा आहे की आपले पाईपलाईनचे काम कोणत्या थराला पोहोचले त्याबद्दल पूर्ण महिती द्या.पाईप कूठून टाकायचा आहे कूठून कूठपर्यत टाकलेला आहे. किती ई.एस.आर.चे काम झालेले आहे. आपली प्रगती काय आहे ते कळू द्या.

सुरेश वाकोडे :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो,ॲडिशनल ७५ एम.एल.डी योजनेच्या कामाची आपण ऑक्टोबरला वर्क ऑर्डर दिली. आणि वर्कऑर्डर नुसार टार्गेट जूनपर्यत कम्पलीट करणार असे आहे. हे काम मार्चपर्यत कसे पूर्ण करणार त्या दृष्टीने आपले प्रयत्न चालू आहेत. आपल्याला शिळ टाकीवरून पाणी मिळणार आहे शिळ टाकीपासून मुकूंद पर्यत लाईन टाकायची आहे. साधारण १२ कि.मी. लाईन आहे. बाजूला ५३६५ मिटरचे पाईप आलेले आहेत. त्यामध्ये२.४ कि.मी. लेईग झालेली आहे.१९६ चे कम्पलीट आहेत. ८५ हे ऑन गोईग आहेत. आता ही पाउस चालू असून आपण काम चालू ठेवलेले आहे. दोन दिवसात १८० मिटर पाईप ले केलेली आहेत................

प्रशांत केळुसकर :-

माझा विषय असा आहे की आपला प्रकल्प कूठून सुरू होतो.

सुरेश वाकोडे :-

शिळ फाटयापासून सुरू होतो.

प्रशांत केळुसकर :-

शिळ फाटयापासून आपण ३-४ ठेकेदार नेमलेले आहेत.

सुरेश वाकोडे :-

चार ठेकेदार नेमलेले आहेत.

प्रशांत केळुसकर :-

ई.एस.आय.साठी वेगळा नेमला आहे. शिळ फाट्यापासून कूठपर्यत आपली लाईन झालेली आहे. ८० कि.मी. १०० कि.मी. सांगू नका.

सुरेश वाकोडे :-

पहिला टप्पा आहे त्याचे ३० टक्के काम झालेले आहे शिळ फाट्यापासून ठाण्यापर्यत येणारी लाईन.

प्रशांत केळुसकर :-

आपले काम कूठे अडकले आहे. आम्ही तुमच्याकडे रिपोर्ट मागत नाही. आम्हाला इनजनरल स्पेसिफिक सांगा की शिळ फाट्यावरून पाईपलाईनचे काम सुरु झालेले आहे. शिळ फाट्यापासून माजिवडा मुकुंदपर्यंत लाईन आली आहे. मुकुंद कंपनीपासून ठाण्यापर्यंत बाकी आहे.

सुरेश वाकोडे :-

आज प्रॉब्लेम काय आहे. एम.आय.डी.सी च्या एरियामध्ये लाईन टाकायची आहे. एम.आय.डी.सी ची एक्झेस्टींग पाईप लाईन ते बदलतात त्या जागेवर टाकायची आहे. म्हणून आपली काम एका लाईनमध्ये सुरु नाहीत. अशी मध्ये-मध्ये पॅचमध्ये काम सुरु आहेत. लाईन रिप्लेस केली तिकडे आपण काम करतो. आता आपले ३० टक्के पर्यंत काम झालेले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेची झाड तोडण्यासाठी परवानगी मागितली होती. ती परवानगी आपल्याला प्राप्त झाली. ठाण्याची परवानगी प्राप्त आहे त्याप्रमाणे तिकडे काम पण चालू आहेत. पावसाळ्यामध्ये काम बंद केलेले आहे. ठाण्याचे काम बंद आहे ते गणपतीनंतर चालू करता येईल.

प्रशांत केळुसकर :-

मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये.

सुरेश वाकोडे :-

नंतरचे जे आहे ते पातलीपाड्यामध्ये जी लाईन आहे त्याच्यामध्ये ६ कि.मी. लाईन आहे. त्याच्यापैकी २.७ कि.मी. लाईन ले केलेली आहे काजू पाड्यापासून.................

प्रशांत केळुसकर :-

काजूपाडा ते पातलीपाडा ह्या पोर्शनचे काय झाले.

सुरेश वाकोडे :-

ती ४ कि.मी. लाईन मागच्या वेळेला टाकली. त्याच्यापुढे कन्टीन्यू टेंडरचे काम सुरु केले होते. काजूपाडा ते हटकेशपर्यंत लाईन टाकायची २.७ कि.मी. लेड केलेली आहे. आताही पावसामध्ये सांगितले आहे की जसे उघड मिळेल तसे काम चालू ठेवायला सांगितले आहे. ह्याच्यात तीसरे आहे ट्रान्समिशन मेल ट्रान्समिशन मेलचे जे आहे इ.एस.आरला जाणारा मेल ट्रान्समिशन मेन असतात. पाणी आपण टाकीमध्ये घेणार ते साधारण ७.५० कि.मी. चे काम आहे त्याचे साधारण ३ कि.मी. काम आपण पूर्ण केले आहे.

प्रशांत केळुसकर :-

इ.एस.आर किती आहेत.

सुरेश वाकोडे :-

टोटल ११ ई.एस.आर आहेत.

प्रशांत केळुसकर :-

कितीची वर्क ऑर्डर दिली आहे.

सुरेश वाकोडे :-

सगळ्यांच्या वर्क ऑर्डर दिल्या आहेत. ई.एस.आर चे ट्रायल फिट घ्यायला लागते. त्यानंतर ह्याला काय डिझाइन करायचे त्याप्रमाणे डिझाइन करायला लागते. आय.आय.टी. कडून अप्रूव्ह करायला लागते.

प्रशांत केळुसकर :-

माझा विषय तो नाही मी तुम्हाला सांगतो ऑल अ स्टेज आपली प्लीन्थ आलेली आहे असे किती ई.एस.आर..........

सुरेश वाकोडे :-

११ ई.एस.आर पैकी १० ई.एस.आरची काम सुरु झाली आहेत. एक ई.एस.आर चे काम बाकी आहे. चार ई.एस.आरच्या फायलिंगचे काम झालेले आहे. बाकीचे रनिंगमध्ये आहे.

प्रशांत केळुसकर :-

ई.एस.आर बांधलेल्या स्टेजला कुठले पोहोचले आता.

सुरेश वाकोडे :-

आता आपण बांधलेल्या स्टेजवर आपण तीन ई.एस.आर आपण आपल्या फंडातून घेतते होते. त्यामध्ये इंद्रलोकचा एक ई.एस.आर आहे. त्याची स्टेचींग कम्पलीट झाली. आता वरचा कन्टेनर बाकी राहीला आहे. सेक्टर नं. २ चा ई.एस.आर आहे त्याची स्टेचींग कम्पलीट झाली. वरचा कन्टेनर बाकी आहे. सर्व्हे नं. २३३ जे आहे १५ नंबर बस स्टॉपच्या तिथे एक ई.एस.आर आहे तो रेडी आहे. तीन ई.एस.आर दिवाळीपर्यंत रेडी राहतील.

प्रशांत केळुसकर :-

एम.आय.डी.सी. रोडचा ई.एस.आर. करायचा आहे तो प्लेझेन्ट पार्कवरुन रस्ता जातो तो.

सुरेश वाकोडे :-

तो तिथे न घेता सिल्वर पार्कच्या तिथे घेतला.

दिनेश जैन :-

ह्याच्यामध्ये काय परवानग्या बाकी आहेत का?

सुरेश वाकोडे :-

एक फॉरेस्टची परवानगी बाकी आहे. फॉरेस्टच्या परवानगीचा पहिला टप्प म्हणजे ठाण्याचे एक ऑफिस आहे. ठाण्याच्या ऑफिसमधून क्लियर केले त्यानंतर तो बोरीवलीच्या ऑफिसमध्ये जातो. बोरीवलीच्या ऑफिसमध्ये क्लियर केले. बोरीवलीच्या ऑफिसमधून एक प्रधान सचिव गोराई साईडला एक आफिस आहे त्या ऑफिसमध्ये गेले. तिथून क्लियर केले तिथून फायनल परवानगी नागपूरवरुन मिळते नागपूरला आपण गेलो आहेत नागपूरला फाईल आपली रुट झाली त्या ठिकाणी त्यांनी एक सर्टिफिकेट करेक्ट करुन मागितले आहे. तेवढे करेक्ट करुन आणि १-२ क्वेरी होत्या त्या. त्याचा आपला कोम्पलायन्स झालेला आहे. कलेक्टर कडून परवानगी मिळाल्यावर आपल्याला परवानगी मिळून जाईल १५ दिवस मॅक्झीमम एक महिना.

दिनेश जैन :-

कुठे अटकला असेल तर स्टॅन्डिंग सदस्यांना माहिती द्या. म्हणजे आपण पण प्रयत्न करु. लोकांच्या हिताचे काम आहे. आपले काम १५ दिवसांनी होणार की एक महिन्यांनी होणार. शासनाकडून आपले काम अटकले आहे ते ............................

सुरेश वाकोडे :-

शासनाचा नियम काय असतो. आपली पहिली योजना मंजूर झाली. योजना मंजूर झाल्यानंतर पहिला हफ्ता रिलीज केला सेकंड रिलीज करण्यासाठी ७० टक्के त्याचा पैसा असतो. ३० टक्के महानगरपालिकेचा पैसा असतो. ३० टक्के खर्च करण्यासाठी ही एफ.डी. आपण तोडतो.

दिनेश जैन :-

सर आपण फॉरेस्टची परवानगी घेतली नाही तर ते आपल्याला पैसे देणार का?

सुरेश वाकोडे :-

फायनल स्टेजला आहे. आता ती फाईल नागपूरला गेली आहे.

दिनेश जैन :-

आपले किती कि.मी. लाईन आहे.

सुरेश वाकोडे :-

शिळफाट्यापासून १२ कि.मी.

दिनेश जैन :-

टोटल किती आहे.

सुरेश वाकोडे :-

टोटल काढायला लागेल.

दिनेश जैन :-

आपल्याला माहित नाही एवढी मोठी योजना पुढच्या मिटींगमध्ये सविस्तर विषय द्या की एवढे झाले. आता काय बोलले ते समजले नाही. आम्ही त्याच्यावर स्टडी करणार काय अडचण असेल तर आम्ही पण सपोर्ट करु.

सुहास रकवी :-

साहेब ही जी २० कोटी रक्कम आहे ते आपले २० कोटीमध्येच होते का?

सुरेश वाकोडे :-

एम.एम.आर.डी.ए चे लोन मंजूर आहे.

सुहास रकवी :-

शासनाचे ७० टक्के जे एम.एम.आर.डी.ए चे असो मंत्रालय असो पण हे २० टक्के रक्कम आहे ती २० कोटीमध्ये झाली आहे का?

सुरेश वाकोडे :-

हो.

सुहास रकवी :-

नंतर आपल्याला काही द्यायचे नाही ना.

दिनेश जैन :-

मा. सभापती महोदय माझे असे म्हणणे आहे की त्यांना सांगा की पुढच्या मिटींगला सविस्तर माहिती दिली की आपण एकत्र व्हिजीट करु.

प्रशांत केळुसकर :-

आपल्याकडे लेईंग ड्राईंग असेल शिळफाट्यातून मिरा भाईंदरला ते लेईंग ड्राईंग एकदा आम्हाला दाखवून द्या. त्याचे प्रेझेन्टेशन द्या आम्हाला माहित पडेल.

दिनेश जैन :-

मा. आयुक्त साहेब आपल्या महानगरपालिकेमध्ये एवढी मोठी योजना सुरु आहे त्याला शासन पैसे देते. आणि किती कि.मी. ते आपल्याला माहित नाही.

प्रभाकर म्हात्रे :-

वाकोडे सर पाण्याचा प्रश्न आला आहे. आपण पहिल्या स्टॅन्डिंगमध्ये चेणा ब्रिजला डॅम बनवायचे आणि तिकडे व्हिजीट करायची ती व्हिजीट झाली का?

सुरेश वाकोडे :-

साहेब आपण इरिगेशन डिपार्टमेंटला पत्राने कळवले कारण त्यात तज्ञ लोक कोण आहेत डॅम बांधणारे इरिगेशन डिपार्टमेंट त्यांना आपण पत्राने कळवले आहे की आमची अशी मागणी आहे. आमच्या नगरसेवकांकडून आणि स्टॅन्डिंगकडून अशी मागणी सारखी येते. त्याच्यात व्हिजीट करुन रिपोर्ट द्या. प्रायमरी एकदा येऊन गेले आहेत आता ते डिटेलिंग करुन पाठवतील.

सुहास रकवी :-

इरिगेशन डिपार्टमेंट अभिप्राय देईल तुम्ही तिथे करायचे आहे. आपल्याकडे इंजिनिअर टेक्नीकल आपल्या पालिकेमध्ये आहेत ना. एखादा प्रयत्न केल्यानंतर ते नकारात्मक देतील असा वाद नाही. तुम्ही व्हिजीट करा. आमच्या बुध्दीमत्तेनुसार आम्हाला जे काही करायचे आहे तुमची बुध्दी लागून सर्वांनी जाऊन व्हिजीट जर करत नाही तर कसे होणार.

सुरेश वाकोडे :-

साहेब आपण व्हिजीट ठरवा.

मा. सभापती :-

आपली व्हिजीट ठरली होती जायचे असे पण ती व्हिजीट झाली नाही.

सुहास रकवी :-

मघाशी विषय म्हणालात अतिक्रमण कारवाई चालू आहे. अतिक्रमण कोणी केले फेरिवाला त्याच्या करता करतो. आमच्या इथे फूटपाथला एक दुकान होते त्यांनी ॲल्युमिनिअमच्या स्लायडिंग उभ्या केल्या ते पण उचलले त्याच्या काचा फोडल्या. ह्याकरिता त्यांना काय मान्यता दिली आहे की संपूर्ण प्रशासन दादागिरीने करणार असेल तर आम्हाला सुध्दा कळवायला पाहिजे. स्थानिक नगरसेवक आहेत की तुमच्या विभागात कारवाई करणार होतो तर कुठे कारवाई करणार, कोणत्या पध्दतीने कारवाई करणार. फेरिवाले सुटतात पण दुकान वाल्यावर कारवाई एकाचे शिलाई यंत्र होते ते जे.सी.पी ने येऊन ब्रेकअप करुन टाकले. त्याला अडीज हजाराचा फटका लागला काय करता ते त्यांना सांगा की तू बाहेर लावू नकोस त्याने मशिन साफ करायला बाहेर ठेवली ती जे.सी.पी. ने ब्रेक अप करुन निघून गेले.

मुन्ना सिंग :-

फेरिवाला झोन ना फेरिवाला झोन सगळ्यांवर कारवाई होते का?

मा. उपायुक्त (मु.) :-

आपण सभागृहामध्ये लक्षवेधीनंतर सगळ्या प्रभाग अधिकाऱ्यांकडून ना फेरिवाला क्षेत्रामध्ये किती लोक बसली आहेत त्याच्या याद्या मागवल्या होत्या. त्या याद्याप्रमाणे डेव्हाईज प्रोग्राम सुरू केला. त्यांना नेमून दिले आहे की ह्या दिवसाला काय कारवाई करायची मध्ये ईद आल्यामुळे ते नेक्स्ट डेला ठेवले होते. ना फेरीवाला क्षेत्रामध्ये मेन जी लोक बसली आहेत मग रस्त्यावर असतील फूटपाथवर असतील परवानगी विरूध्द काही सामान ठेवले काही जोडण्या ठेवल्या असतील तर आपल्या ह्यानुसार त्यांनी कारवाई केलेली आहे. जे केले आहे त्याचे लिस्टींग केले आहे की कोणचे काय सामान उचलले सिलेंडर उचलले असेल,गाडा उचलला असेल कोणाचे काय सामान उचलले त्या पध्दतीने लिस्टिंग केले आहे. त्या पध्दतीचा रिपोर्ट पण त्यांनी केला आहे.

मुन्ना सिंह :-

लिस्टींग और रिपोर्ट की बात कर रहे है। उसके बारेमे शरदभाई बात करेंगे मेरे को यह जानकारी लेना है की फेरीवाला क्षेत्र और ना फेरीवाला क्षेत्र जो है फेरीवाला क्षेत्र का लिस्ट मगाऐंगे।

मर्लिन डिसा :-

मा.सभापती साहेब काम माझ्या वॉर्डमध्ये जी तोडफोड झाली तिथे सिध्दार्थ नगरमध्ये दूकानवाल्यांनी अतिक्रमण केलेले आहे. मी वारंवार पत्रव्यव्हार केलेला आहे. सोसायटीच्या लोकांनी येऊन कम्पलेन्ट दिलेली आहे. तेव्हा काही झाले नाही. काल अचानक तोडायला सुरुवात केली. फर्स्ट फ्लोरमध्ये हॉस्पीटल आहेत, काही लोकांचे क्लिनीक आहेत, डेन्टल क्लिनिक ॲन्ड नर्सिंग होम्स तिकडून लगेच रेसीडन्स लोकांचे फोन यायला लागले की आम्हाला फर्स्ट फ्लोरवाल्यांना आता डेंजर झालेले आहे. इथून डायरेक्ट जे.सी.पीने तोडून टाकले. कितीतरी फोन आले. त्याच्यानंतर एमटीएनएल रोडवरती एक शाळा आहे प्रायमरी आणि प्रि. प्रायमरी त्यांची केबीन तोडून टाकली. संस्था आहे मूल तिकडे शिकतात पालक येतात तर कमीत कमी त्यांना नोटिस तरी द्यायची की नाही. लगेच असे तोडून टाकायचे. अतिक्रमण झालेले दिसते एवढी वर्ष झाले अतिक्रमण केलेले आहे. आम्ही कम्पलेन्ट करुन सुध्दा तिकडे काय ॲक्शन घेत नाही. अचानक तुम्ही जाऊन त्यांना नोटिस न देता इन्फॉर्म न करता अचानक असे केले तर बरोबर आहे का?

मा. उपायुक्त (मु.) :-

मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्यांचे जसे म्हणणे आहे आपण जी कारवाई करतो त्याला नोटिस द्यायची आवश्यकता नाही.

सुहास रकवी :-

नाही साहेब तुम्ही आता लक्षवेधी सांगितले फेरिवाला अतिक्रमण.

शरद पाटील :-

मा. सभापती साहेब आजच्या तारखेला आपली जी लक्षवेधी होती ती फेरिवाल्यांना उचलायची होती. फेरिवाल्यांना उचलायचे बाजूला राहू द्या त्या फेरिवाल्यांना आपली लोक जाऊन सांगून येतात की उद्या बसू नका आम्ही येणार आहोत. त्या दिवशी एकही माणूस तिकडे बसत नाही. आणि तुम्ही दुकानवाल्यावर कारवाई करता. आणि दुकानवाल्यावर जी कारवाई करता ती त्याच्या ओटल्यावर किंवा फुटपाथवर असलेला माल नाही. तर त्याच्या शटरच्यामध्ये असलेला माल उचलून घेऊन जातात. मिरा भाईंदर शहरामध्ये तुम्ही नगरसेवकांचे नाव खराब करायला घेतले आहे. आम्ही तुमच्या कोणत्याही कारवाईच्यामध्ये येणार नाही. पण तुम्ही लोकांचा माल उचलून नेल्यानंतर तिथे वाटप सुरु होतो की हे माझ हे माझ असे कर्मचारी तिकडे करत असतात. दुकानाच्या आतमधला माल का उचलून नेतात. फेरिवाल्यांवर आजही कारवाई होत नाही फेरिवाले सगळे सुखाने बसले आहेत. ती कारवाई दुकानवाल्यांवर करायला घेतली आहे. फुटपाथवर दुकानवाल्यांचा असलेला माल उचला आम्ही कोणी बोलणार नाही. पण दुकानाच्या आतमध्ये असलेला माल उचलायचा आणि बाहेर आहे असे सांगायचे आणि त्याच्या वाटण्या तिथे करत बसायचे हा फार भयानक प्रकार तिथे चाललेला आहे. हा प्रकार तुम्हाला थांबवायला लागेल.

मा. उपायुक्त (मु.) :-

हे अशासाठी मान्य करणार नाही की सगळ्या अधिकाऱ्यांना सांगितले होते की दुकानाच्या आतला माल कोण उचलणार नाही ह्या संदर्भात काही स्पेसिफिक तक्रार असेल तर त्याबद्दल त्यांना विचारणा करु पण लिस्ट केली आहे त्याच्यात रस्त्यावरचे फेरिवाले आहेत आणि शेड किंवा जोडण्या आहेत. त्याची कोणतीही परवानगी नव्हती त्याला नोटिस द्यायची आवश्यकता नाही.

सुहास रकवी :-

ते दुकानदार म्हणजे फेरिवाले नाहीत. परत तुम्ही मिक्स अप करता. त्यांना नोटिस द्यायची गरज नाही कोणत्या कायद्याने सांगितले.

मा. उपायुक्त (मु.) :-

२३२ मध्ये आहे.

(सभागृहात गोंधळ)

शरद पाटील :-

उपायुक्त साहेब आम्ही काय बोलतो तुम्हाला आम्ही बाहेर आलेले पत्रे काढा, छपरे बाहेर आले आहेत त्याचे काहीतरी डेफीनेशन असेल ना किती छपरा बाहेर पाहिजे किती नाही हे तुम्हाला बघायला लागेल.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपल्या शॉप ॲक्टप्रमाणे जे दुकानाचे पाटा आहेत ना ते ४ ते ४.५० फुट आहेत ते साधारण २.५० असे काहीतरी आहेत त्याच्यापेक्षा पुढे आहे ते अनधिकृत समजायचे.

शरद पाटील :-

आपण फेरिवाल्यांना उचलायचे सोडून त्या दुकानवाल्यांच्या मागे लागता पहिले फेरिवाल्यांना उचला फेरिवाल्यांना उचलल्यावर फुटपाथवर दुकानवाल्यांचा माल आहे तो उचला. जेव्हा फेरिवाले उठतील तेव्हा दुकानवाले तो माल बाहेर ठेवणार नाहीत.

मा. उपायुक्त (मु.) :-

साहेब मी स्वतः १ नंबर २ नंबरमध्ये होतो. मी असे बघितले की आपल्या गाड्या तिथून गेल्या गेल्यानंतर एक शॉपवाला होता त्याचे ४.५० फुटाच दुकान पुढे आले होते. आम्ही बाजूला बघितले त्याच्यात एवढं काही नव्हतं लांबून बघितल्यावर लक्षात आले नाही. आम्ही पुढे गेलो त्याच्यानंतर एक भाजीची गाडी आली तर तो अख्खा भाजीपाला त्यांनी आतमध्ये ठेवला. म्हणजे ते फेरिवाल्यांना सपोर्ट करतात. नंतर त्याचे पूर्ण ह्याच्यावर होते ते काढून घेतले.

मा. सभापती :-

आपण ज्यावेळी कारवाई करायला जाता त्याच्या अगोदर आपले अधिकारी त्या भाजीवाल्याच्या गाडीवाल्यांना फोन करुन सांगतात. त्यामुळे गाड्या लागत नाही. त्यामुळे दुकानवाल्यावर कारवाई होते. मी स्वतः उभा राहून बघितले आहे.

शरद पाटील :-

तुम्हाला कारवाई करायला वाटत नाही.

मर्लिन डिसा :-

साहेब किती नुकसान झाले आहे.

(सभागृहात गोंधळ)

मा. सभापती :-

अधिकाऱ्यांना बोलवून घ्या. तिथून फोन जातात त्यामुळे गाड्या लावत नाही. मग तुम्ही कारवाई कोणावर करणार?

रवि व्यास :-

सभापती के परमीशनसे बोलता हूँ। फेरिवाले का विषय मैंने पहले भी उपायुक्त के सामने बोला था एक बार आप फेरिवाला का जो पथक है उनका इन्टरनल ट्रान्सफर के वजह परमनन्ट ट्रान्सफर करीए लेकिन १० बार बोलने के बाद भी ट्रान्सफर हुआ नही। मैंने आपको बोला की फेरिवाला पथक के जो भी प्रमुख है उन लोगो के फेरिवाले रिलेशन बन गए है। इसलिए मैं आपको बोलता हूँ आपके लिए १० मिनिट का काम है।

सुहास रकवी :-

आमच्या सगळ्यांची मागणी आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

प्रभाग समिती ५ पर्यंत कारवाई आलेली आहे. प्रभाग समिती ६ ची कारवाई होऊन जाऊ दे. त्यानंतर मी सर्वांच्या बदल्या करतो. त्या दिवशी मी मा. आयुक्त साहेबांना पण बोललो. १ नंबरवाला ६ नंबरला जाईल किंवा ६ नंबरवाला १ नंबरला जाईल असे काही करणार नाही. तर ऑफिसमधला स्टाफ तिकडे टाकून त्यांना इकडे घेणार.

मा. सभापती :-

अतिक्रमणच्या गाडीवर असतात त्यांची पहिली बदली करा.

रवि व्यास :-

फेरिवाले का बैठने का जो समय है वो बेसीकली शाम को रहता है। फेरिवाले का मेन बिझनेस शाम को होता है। और हमारा फेरिवाला पथक सुबह १२ बजे कारवाई करने को निकलता है। तब फेरिवाले की संख्या ५० टक्के रहती है। क्योंकी ५० टक्के शाम को बैठते है। उसमे भी उनको इन्फॉमेशन मिलती है की गाडी निकली है तो वो लोग वहाँ पे मिलते नही है। तो कारवाई होती नही है। आप ऑफिसर लोग कारवाई पे जाते है तो कारवाई हो नही पाती है। मेरी रिक्वेस्ट है की फेरिवाले पे जो कारवाई करनी है वो शाम को ६.००

बजे की जाए। शाम के ६.०० से ८.०० बजे जब कोई कारवाई होगी तो उसका रिझल्ट निकलेगा। सावंत साहेब दुपार को २.३० बजे शिवसेना गल्ली के कारवाई करने को गए थे अभी २.३० बजे कोई फेरिवाला बैठेगा क्या। गाडी लेके जाते है और बोलते है मी जाऊन आलो अरे काय जाऊन आले त्यावेळी कोण राहणार नाही तुम्ही संध्याकाळी जा.

सुहास रकवी :-

लक्षवेधी केली त्याचा मुख्य उद्देश आहे तो साध्य झाला पाहिजे. नाहीतर फेरिवाले मोकळे राहतील आणि नको त्याच्यावर कारवाई होणार आहे. त्याचे नियोजन कसे करायचे ते तुम्ही करु शकता. त्यांनी बरोबर सांगितले ६.०० ते ८.०० कारवाई करा. चार दिवस कारवाई केल्यावर पाचव्या दिवशी तो फेरिवाला दिसणार नाही.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपण सकाळी दोनच प्रभागाचे फोर्स घेतलेला होता. संध्याकाळी तीन अशा दोन सत्रामध्ये करत होतो. सकाळी ८.०० वाजता आपली लोक येतात मी स्वतः ८ ला आलेलो आहे. सकाळी ८ ते दुपारी १.३० नंतर लंच घेऊन ४ वाजता आमचे लोक कामाला लागायचे. संध्याकाळच्या वेळेस तीन प्रभागची लोक राहतात सकाळी दोन प्रभागाची लोक राहतात जी लोक रात्री काम करतात संध्याकाळचे उशीरापर्यंत ज्यांची मूळ विभागामध्ये कारवाई राहते ते लोक दुसऱ्या दिवशी येत नाहीत म्हणून त्यांना एक दिवसाची सुट्टी रिव्ह्यू करतो. पहिला हा ड्राईव्ह होऊन जाऊ दे नंतर आपल्या ज्या त्रूटी किंवा सुधारणा असतील त्यानुसार आपण पुढचे नियोजन करु.

मर्लिन डिसा :-

सर तुम्ही बोलतात की त्यांना नोटिस द्यायची गरज नाही. कोणाला दुकानवाल्यांना की फेरिवाल्यांना.

मा. उपायुक्त (मु.) :-

दुकान आणि फेरिवाले ज्यांनी कुठे हे केलेले असेल नगरपालिकेच्या परवानगी विरुध्दात असेल परवानगी न घेता केल असेल...........

मर्लिन डिसा :-

त्यांना नोटिस द्या ना त्यांच्यावर एमआरटीपी लावा.

मा. उपायुक्त (मु.) :-

अशासाठी मान्य करणार नाही की टॅक्स अधिकृत असला, अनधिकृत असला, शास्तीवाला असला तर टॅक्स म्हणजे कुठला हक्क प्राप्त होत नाही.

मर्लिन डिसा :-

ठीक आहे पण तुमही एमआरटीपीची कारवाई करुन त्यांच्यावर ॲक्शन घ्या. तुम्ही त्यांना नोटिस द्या. आता ९-१० वर्षापासून त्याचे काम चालू आहे. अचानक ही कारवाई करता.

मा. उपायुक्त (मु.) :-

प्रश्न असा आहे आपल्याकडे अधिनियमामध्ये सुध्दा तरतूद झालेली आहे. एमआरटीपीच्या दोन ॲक्टनुसार काय होते एमआरटीपी केल्यानंतर आपल्याला टेम्परری स्ट्रक्चर असेल १५ दिवस थांबायला लागते आणि जर परमनन्ट स्ट्रक्चर बांधले असेल तर एक महिना थांबायला लागते. दरम्यानच्या काळात कॅवेट दाखल करणे ह्या सगळ्या प्रोसीजरमध्ये त्यांना स्टे मिळून जातो. अजूनही अधिनियमामध्ये सुधारणा झाली असताना सुध्दा कोर्टामधून एकतर्फी स्थगिती दिली जाते. त्याचा त्याला फायदा मिळतो आणि कारवाईला व्यत्यय येतो. १० ठिकाणी कारवाई होते मग दोन ठिकाणची कारवाई थांबते म्हणून आम्ही एमआरटीपीला मुद्दाम जात नाही की आपल्याला कारवाई झाली पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

शरद पाटील :-

मा. उपायुक्त साहेब आम्हाला थोडक्यात सांगा की, तुम्ही फेरिवाल्यांवर कारवाई करणार की दुकानवाल्यांवर कारवाई करणार ते सांगा.

मा. उपायुक्त (मु.) :-

मेनली फेरिवाला जे ना फेरिवाला क्षेत्रामध्ये बसलेले आहेत त्याच्यावर मेन आहे.

मर्लिन डिसा :-

आणि जे ना फेरिवाला क्षेत्रामध्ये लाईन लागते ना फेरिवाल्यांची त्यांना काय करणार अजून तिकडे.

शरद पाटील :-

ना फेरिवाला क्षेत्रातलच उचलल ना.

मर्लिन डिसा :-

नाही उचलल ना.

शरद पाटील :-

म्हणून मी थोडक्यात विचारले की तुम्ही फेरिवाल्यांवर कारवाई करणार की दुकानवाल्यांवर कारवाई करणार? तुम्ही दुकानवाल्यांवर कारवाई करणार त्याच्यात आमचा कुठेच वाद नाही. तुम्ही फुटपाथवर सामान आहे त्याचे करा पण पहिला फेरिवाल्यांना उचला त्याच्यानंतर दुकानवाल्यांवर..........

सुहास रकवी :-

दुकानवाले कशाला फुटपाथवर ठेवतील. फेरिवाले त्याच्या समोर धंदा करतात म्हणून ते ठेवतात. माणसाला अडचण झाल्यावर अशा क्रिया होतात. तुम्ही एक समजून घ्या फेरिवाल्यांना हटवण्यासाठी प्राधान्याने मागणी दुकानदारांची आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

फेरिवाल्याचा जेवढा प्रचंड विरोध होता त्याच्यानंतर अनेक ठिकाणी आपण पाच दिवसांमध्ये गुन्हे दाखल केले आहेत. ज्या लोकांनी विरोध केला आपल्याला आडकाठी केली त्याच्यावर आपण गुन्हे दाखल केले.

मा. सभापती :-

गावठण एरियामध्ये जाऊन सुध्दा गाड्या तोडल्या. गावामध्ये मेनरोडवर कारवाई करायला सांगितली.

सुहास रकवी :-

साहेब एक लाईन मारा की ह्याच्यावर फेरिवाला बसणार नाही.

शरद पाटील :-

नवघर गाव, खारीगाव...........

दिनेश जैन :-

मा. उपायुक्त साहेब आतापर्यंत सर्व सदस्यांचे आणि सर्व मिरा भाईंदर नागरिकांचे हित बघून असे आहे की पहिले आपण फेरिवाल्यांवर कारवाई करा नंतर दुकान वाल्यावर कारवाई करा. त्यांची मजबूरी आहे की फेरिवाले बाहेर बसतात. म्हणून ते माल लावतात नाहीतर ते फेरिवाले बसले नाही ना अनधिकृत फेरिवाला क्षेत्रामध्ये ते माल लावणार नाही. म्हणून पहिले तुम्ही फेरिवाला आणि दुकानवाल्यांवर कारवाई करा.

मा. उपायुक्त (मु.) :-

आज आपण कारवाई घेतलेली नाही. आज आणि उद्या कार्यक्रम असल्यामुळे..........

दिनेश जैन :-

आता ५ प्रभागामध्ये जेवढी कारवाई घेतली जेवढा माल आणलेला आहे तो बघा त्याच्यात ९० टक्के दुकानवाल्याचा माल असेल. १० टक्के फेरिवाल्यांचा तुम्ही बघून घ्या.

मर्लिन डिसा :-

सर काही शाळा आणि संस्था क्लीनीक असतील त्यांना तुम्ही नोटिस द्या. पेशंट, विद्यार्थी आणि पालक असताना तिकडे कोणाला धोका झाला तर काय करायचे.

मा. उपायुक्त (मु.) :-

जिथे पब्लीक एबीलीटी बिल्डींग आहे ना तिथे आम्ही लक्ष देतो.

नरेश पाटील :-

साहेब माझ्या वॉर्डात कधी कारवाई करणार. ब्रिजच्या खाली कारवाई करा.

भोपतराव :-

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, तुम्ही जेव्हा फोन केला तेव्हा ताबडतोब गाडी पाठवली.

(सभागृहात गोंधळ)

दिनेश जैन :-

साहेब आपला मला फोन आला होता. रमझानपर्यंत खाऊगल्लीला कॉर्नर नाही आता रमझानचा महिना पूर्ण गेला आहे. ते खाऊगल्लीचे बघून घ्या.

भोपतराव :-

तुमच्या ज्या तक्रारी आहेत त्याप्रमाणे आपला फेरिवाला पथक आहे रोजची कारवाई असते. ज्यावेळी गाडी जाते तेव्हा त्यांना गाडी दिसली की ते निघून जातात. गोष्ट खरी आहे परंतु कर्मचारी किंवा अधिकारी फोन करतात हे मत मी मान्य करत नाही. अधिकारी सांगत नाही की..........

दिनेश जैन :-

खाऊगल्लीचा विषय मांडतो.........

भोपतराव :-

त्याची गाडी तुमच्यासमोर पकडली. तुम्ही बोललात गाडी उचलून न्या.

दिनेश जैन :-

ते काय सांगितले की रमझानचा महिना आहे जाऊ द्या. आम्ही बोललो काय हरकत नाही.......

भोपतराव :-

तुमचा अगोदर फोन आला ना तेव्हा आम्ही ६ गाड्या उचलल्या होत्या आणि त्या गाड्या तोडल्या.

प्रकरण क्र. ४१ :-

अनुसुची ''ड'' प्रकरण २ (के) अन्वये प्रस्ताव - महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ७५ द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेसाठी राखीव निधीतील रक्कम सर्वसाधारण निधीत वळती करणेबाबत.

ठराव क्र. ३९ :-

मिरा भाईदर शहरात सद्याची पाणी पुरवठा तफावत पुर्ण करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून अतिरिक्त ७५ द.ल.लि. पाणी मंजुर करण्यात आलेले आहे. मंजुर अतिरिक्त ७५ द.ल.लि.पाणी शहरापर्यंत आणणे करीता राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नविन पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत येणारी कामे प्रगतीपथावर आहेत. महापालिका क्षेत्रात अपुरा पाणी पुरवठा होत असल्यामुळे सदर योजना विहित कालावधीत पुर्ण करणे अतिशय आवश्यक आहे. सदर योजनेसाठी महानगरपालिकेचा स्वतःचा हिस्सा सन २०१६-१७ या वित्तिय वर्षाचे अंदाजपत्रकात पृष्ठ क्र.५४ वरील अनु.क्र. १ (ब)(२) मध्ये 'जल व मलप्रवाह निधी अंशदान' अंतर्गत २०००.०० लक्ष तरतुद आहे. सदरील राखीव निधीतुन पाणी योजनेसाठी देयक प्रदानाची कार्यवाही करण्यासाठी राखीव निधी मुदत पूर्व सर्वसाधारण निधीवर जमा करुन घेऊन प्रदान करावा लागणार आहे. तरी राखीव निधीतील रक्कम सर्वसाधारण निधीवर जमा करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-

सभा संपली असे जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ दु. १२.४० वाजता)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका